**<u>पुढील उर्वरित उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री.एस.एन.भणगे यांचेतर्फे सुरु –</u>**

०५. ज्यासाठी इमारत बांधण्यात आली होती ते देवस्थान म्हणजे श्री देव वेतोबा होय. साक्षीदार नामे जयवंत बाबूराव राय हे श्री देव वेतोबा न्यासाचे चेअरमन आहेत. सावळाराम अनंत टाक्कर हे श्री देव वेतोबा न्यासाचे सचिव आहेत. माझ्या म्हणण्यानुसार तथाकथीत घटना ही दि. १०/०७/२०१४ रोजी घडली. मी दि.३१/०८/२०१५ रोजी तक्रारी अर्ज केला होता. हे म्हणणे खरे आहे की त्या तक्रारी अर्जामध्ये मी कोणत्याही आरोपींची नावे लिहिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की दि. २३/०३/२०१७ रोजीच्या तक्रारी अर्जामध्ये मी आरोपींची नावे लिहिली आहेत. हे म्हणणे खरे आहे की दि. ३१/०८/२०१५ रोजीच्या तक्रारी अर्जामध्ये आरोपींची नावे लिहिण्यास मला कोणतीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की देवस्थानाच्या वादावरुन आरोपींची खोटी नावे दि. २३/०३/२०१७ रोजीच्या तक्रारी अर्जात मी लिहिली होती. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी तपासकाम सुरु करण्यापुर्वी मी सदर केसमध्ये माझे तपासकाम सुरु केले. सदर केसमध्ये जे शपथपत्र दाखल आहे त्याच्याशी माझा कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर केसमध्ये प्रतिज्ञापत्रासाठी लागणारा मुद्रांक हा माझ्या नावे व माझ्या सहीने विकत घेतलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की सरकारी यंत्रणेस वैयक्तीक व्यक्तीस कोणत्याही जमिनीवर जर बांधकाम करायचे असल्यास त्याला ती जमीन विकत घ्यावी लागेल किंवा संपादित करावी लागेल. ज्या जमिनीवर कथीत पे ॲण्ड युज टॉयलेटची इमारत बांधली गेली ती जमीन संपादित केल्याचे माझ्या निदर्शनात आले नाही. आरोपी क्र. ३ बाळकृष्ण येसजी यांच्या जमिनीत पे ॲण्ड युज टॉयलेटची टाकी बांधण्याचा प्रयत्न केला याची मला कल्पना होती. हे म्हणणे खरे आहे की आरोपी क्र. ३ व त्याचे कुटुंबीय हे त्यांची जमीन पे ॲण्ड युज टॉयलेटची टाकी बांधण्यासाठी देण्यास तयार नसल्याचे मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांनी सहाय्यक उपलोकायुक्त, मंत्रालय मुंबई यांना कळविले होते. हे म्हणणे खरे आहे की जीवन प्राधिकरण, कणकवली यांनी कार्यकारी अभियंता जीवन प्राधिकरण, कणकवली यांना दि. १९/०७/२०११ रोजीच्या पत्राने पे ॲण्ड युज टॉयलेटचे काम रद्द करण्याची शिफारस केली होती व सदर इमारतीस कुलुप लावण्यात यावे असे कळविले होते. उपलोकायुक्त मंत्रालय मुंबई यांच्या कार्यालयात दि.०३/०४/२०१७ रोजीच्या मिटींगमध्ये मी स्वतः हजर होतो, त्यामध्ये आरोपींची नावे निष्पन्न झाली नव्हती.

०६. हे म्हणणे खरे आहे की आरोपी क्र. २ च्या मुलाविरुध्द माझ्या मुलीने केस दाखल केली होती. हे म्हणणे खरे आहे की त्याकामी जिल्हा व सत्र न्यायालयात मी माझ्या मुलीला मारहाण करुन तिला खोटी केस दाखल करण्यास प्रवृत्त केले असा आरोप ठेवण्यात आलेला असून ती केस न्यायप्रविष्ठ आहे. माझ्या म्हणण्यानुसार कथीत पे ॲण्ड युज टॉयलेट अजूनही चालू आहे. हे म्हणणे खरे आहे की सदर केस दाखल होण्यापुर्वी कथीत पे ॲण्ड युज

टॉयलेट हे बंद स्थितीत होते. हे म्हणणे खरे आहे की कथीत पे ॲण्ड युज टॉयलेटची इमारत ही उपरोक्त देवस्थानच्या लगत आहे. हे म्हणणे खरे आहे की श्री देव वेतोबा देवस्थान हे जागृत असून त्याच्या आवारात स्वच्छता व धार्मिक बाबींची पाळणूक केली जाते. हे म्हणणे खरे आहे की काही ग्रामस्थांनी कथीत पे ॲण्ड युज टॉयलेटची इमारत मुळे धार्मिक बाबींचे व स्वच्छतेचे उल्लंघन झाले असल्याबाबत लेखी ग्रामपंचायत कार्यालय आरवली येथे कळविले होते. हे म्हणणे खरे आहे की त्या तक्रारी अर्जावर सदर केसमधील काही साक्षीदारांच्या लेखी सहया होत्या.

०७. हे म्हणणे खरे नाही की दि.१०/०७/२०१४ रोजी गणेश रघुनाथ रेगे वगैरे लोकांनी पे ॲण्ड यूज टॉयलेट या इमारतीचे बांधकाम तोडण्यासाठी अण्णा झांटये व विजय नाईक शिरोडा याचा जे.सी.बी. आणलेला होता. पे ॲण्ड यूज टॉयलेट या इमारतीजवळून आरवली गावातील देवाची जाण्या–येण्याची वाट असल्यामुळे इमारतीचे बांधकाम तोडण्यात आले. सदर इमारतीचे बांधकाम तोडतेवेळी तेथे गणेश रघुनाथ रेगे, बाबूराव अनंत आरोलकर, बाळकृष्ण गोविंद येसजी, यशवंत भिवा कांबळी, सुभाष पांडुरंग पेडणेकर, सावळराम गुंडू कुडव, सुभाष भिवा कांबळी व विजय भालचंद्र मेस्त्री हे लोक उपस्थित होते. या लोकांनी इमारतींच्या शिगा तोडून त्या डंपरमध्ये भरत होते. दोन डंपर होते. हे मी माझ्या प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिले आहे. सदरची इमारत तोडण्यासाठी ग्रामपंचायत अगर शासनाचा आदेश नव्हता. त्यानंतर मी सदर शासकीय इमारत तोडलेबाबत व त्याबाबत कोणती कारवाई केल्याबाबत ग्रामपंचायतीकडे तक्रारी अर्ज केला होता. ग्रामपंचायतीने माझ्या तक्रारी अर्जाची कोणतीही दखल घेतली नाही. त्यानंतर मी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, सावंतवाडी यांना इमारत बांधकाम तोडल्याबाबत कळविले. त्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, सावंतवाडीचे अधिकारी घटनास्थळी येवून पाहणी करुन गेले. फिर्यादी हे घटनास्थळाची पाहणी करण्यासाठी आले होते. त्यानंतर मी जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांच्याकडे तक्रारी अर्ज केला होता. त्यांनी देखील त्याबाबत कोणतीही कारवाई केली नाही. मी सन २०१५ मध्ये लोकायुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडे तक्रारी अर्ज दिला. त्यानंतर दि. १०/०२/२०१७ रोजी त्या तक्रारी अर्जावर सुनावणी झाली. त्या सुनावणीला जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग, जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, सावंतवाडी व सिंधुदुर्गचे अधिकारी हे उपस्थित होते. सदर सुनावणीमध्ये लोकायुक्त यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, सावंतवाडी व सिंधुदुर्गचे अधिकारी यांना गुन्हा दाखल करण्याचे आदेश केले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपींच्याप्रती असलेल्या माझ्या द्वेषापोटी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/–
(के.के.पाटील)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.

दिनांक– १३/०१/२०२३